# प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

७.१ प्रस्तावना

७.२ अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष

७.२.१ साखर उद्योगासंबंधीचे निष्कर्ष

७.२.२ निवडलेल्या साखर कारखान्यांसंबंधीचे निष्कर्ष

७.२.३ कारखान्यांच्या सभासदासंबंधीचे निष्कर्ष

७.२.४ कारखान्यांतील कायम व हंगामी कामगांरासंबंधीचे निष्कर्ष

७.२.५ कारखान्यातील ऊसतोड व वाहतूक मजुरांसंबंधीचे निष्कर्ष

७.३ प्रमुख शिफारशी

७.३.१ साखर कारखान्यांसंबंधी शिफारशी

७.३.२ कारखान्यांच्या सभासदासंबंधीच्या शिफारशी

७.३.३ कारखान्यांतील कायम व हंगामी कामगारांसंबंधी शिफारशी

७.३.४ कारखान्यांतील ऊसतोड व वाहतूक मजुरांसंबंधीच्या शिफारशी

७.४ गृहितकाची पडताळणी:

७.५ आर्थिक व सामाजिक परिवर्तणाचे घटक:

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

## ७.१ प्रस्तावना

प्रस्तुत अध्ययनासाठी पुणे जिल्ह्यातील निवडक सहा साखर कारखान्यांच्या ३६० सभासद १८० कायम व हंगामी कामगार (अंतर्गत कामगार) व १८० ऊसतोड मजुरांकडून प्रश्नावली व मुलाखत तंत्राच्या साह्याने संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केले असून, त्यासंबंधीचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

## ७.२ अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष :

### ७.२.१ साखर उद्योगासंबंधीचे निष्कर्ष :

१. प्रामुख्याने जगात दोन प्रकारे साखर तयार केली जाते. साखर उत्पादीत करणाऱ्या देशांमध्ये प्रमुख भारत, ब्राझील, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, इजिप्त या देशांचा समावेश होतो तर बीटापासून साखर उत्पादीत करणाऱ्या देशांमध्ये प्रमुख जर्मनी, फ्रान्स, बेल्जियम, अमेरिका, रशिया या देशांचा समावेश होतो. जागतिक साखर उत्पादनाचा विचार करता बीटापासून उत्पादीत होणाऱ्या साखरेचे प्रमाण घटत असून ऊसापासून बनलेल्या साखरेचे प्रमाण सतत वाढत आहे.

२. जागतिक साखर उत्पादन करणाऱ्या देशांमध्ये सन २०१०-११ यावर्षी जगात ब्राझीलचा पहिला क्रमांक तर भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

३. भारतीय साखर उद्योगाची प्रगती स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन कालखंडात अभ्यासली जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९३०-३१ मध्ये देशात २९ साखर कारखाने होते त्यावर्षी एकूण साखर उत्पादन १२० हजार टन झाले ते सन १९४५-४६ पर्यंत देशात १४५ साखर कारखाने वाढून एकूण साखर उत्पादन ९५९ हजार टनापर्यंत वाढले यावरून स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय साखर उद्योगाने आपल्या प्रगतीचा पाया मजबूत केला तसेच साखर उद्योगासाठी पोषक वातावरणही निर्माण केले.

४. देश स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात लोणी-

प्रवरा येथे 'प्रवरा सहकारी साखर कारखाना' या नावाने सुरू झाला आणि देशात सहकारी साखर कारखानदारी मोठ्या प्रमाणात विस्तारली गेली.

५. देशात सन १९५०-५१ मध्ये १३९ साखर कारखाने होते यावर्षी देशात ५४८३३ हजार टन ऊसाचे उत्पादन झाले तर एकूण साखर उत्पादन ११०० हजार टन झाले. सन २००१-०२ यावर्षी देशात ४३४ साखर कारखाने होते देशात एकूण ऊसाचे उत्पादन २९७२०८ हजार टन झाले तर एकूण साखर उत्पादन १८५२८ हजार टन झाले ते २०१०-११ यावर्षी देशात एकूण ४९० साखर कारखाने चालू होते. यावर्षी ऊसाचे उत्पादन २९२३०२ हजार टन झाले तर एकूण साखर उत्पादन १८९१२ हजार टन झाले होते. यावरून स्वातंत्र्योत्तर काळात साखर उद्योगाने मोठी मजल मारली आहे असे दिसून येते.

६. देशात सन २०१०-११ यावर्षी सर्वाधिक साखर कारखाने १४३ महाराष्ट्र राज्यात तर दुसरा क्रमांक १२८ उत्तर प्रदेशाचा आहे असे असतानांही सर्वाधिक साखर उत्पादन उत्तर प्रदेशात होते तर दुसरा क्रमांक महाराष्ट्र राज्याचा लागतो.

७. सन २०००-०१ मध्ये महाराष्ट्र राज्यात १२६ साखर कारखाने होते राज्यात ऊस लागवडी खालील क्षेत्र ५९५ हजार हेक्टर होते तर साखर उत्पादन ६७०५ हजार टन झाले होते त्यामध्ये मोठी वाढ होऊन सन २०१०-११ मध्ये राज्यात साखर कारखान्यांची संख्या १४३ झाली तर ऊस लागवडीखालील क्षेत्र ७५६ हजार हेक्टर होते तर एकूण साखर उत्पादन ७६७ हजार टनापर्यंत वाढले होते यावरून महाराष्ट्र राज्यात साखर उद्योग मोठी प्रगती करत असून साखर उद्योगामुळे ग्रामीण भागातील विकासाला मोठी चालना मिळत आहे.

८. सन २०१०-११ यावर्षी पुणे जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यामध्ये एकूण १७ साखर कारखाने सुरू होते त्यामध्ये १२ सहकारी तर ५ खाजगी साखर कारखाने आहेत. जिल्ह्यातील कार्यरत साखर कारखान्यात ५००० में टन गाळप क्षमता असलेले विघ्नहर, भिमापाटस व इंदापूर हे कारखाने असून सर्वात कमी क्षमता १२५० में. टन राजगड कारखान्यात आहे. सर्वाधिक साखर उत्पादन इंदापूर साखर कारखान्यात १४९७६६० टन झाले ते विघ्नहर साखर कारखान्यात १२७३२९० टन साखर उत्पादन झाले. जिल्ह्यात सर्वाधिक साखर उतारा दौंड शुगर या खाजगी कारखान्यात ११.५३ टक्के मिळाला तर सर्वात कमी यशवंत कारखान्यात ७.५६ टक्के एवढा दिसून आला. यावरून पुणे जिल्ह्यातील साखर कारखाने दिवसेनदिवस मोठी प्रगती करत असून त्यामूळे जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखान्यांचे सभासद,

कारखान्यांतील कायम कामगार व ऊसतोड मजुरांच्या जीवनमानात व राहणीमानात तसेच जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात मोठा सकारात्मक बदल घडून येत आहे.

### ७.२.२ निवडलेल्या साखर कारखान्यांसंबंधीचे निष्कर्ष

९. सन २०१०-११ यावर्षी निवडक साखर कारखान्यांनी वृक्षारोपण व पर्यावरण संतुलनासाठी ५.४७ टक्के खर्च केला तर सर्वाधिक विघ्नहर कारखान्याने २.२० टक्के तर सर्वात कमी ०.२० टक्के खर्च राजगड कारखान्याने केला.

१०. निवडक साखर कारखान्यात सन २०१०-११ यावर्षी एकूण हंगामी २९६३ तर कायम १६४७ एवढ्या लोकांना रोजगार उपलब्ध झाला होता.

११. जिल्ह्यातील निवडक साखर कारखान्यांतील एकूण साखर शाळा ६, बालवाड्या ६, प्राथमिक शाळा ५, माध्यमिक शाळा ६, तंत्रनिकेतन ५ तर महाविद्यालयांची संख्या यामध्ये आय.टी.आय., डिग्री, शेतकी अशा विविध १६ संस्था सुरू केल्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात मोठी शैक्षणिक प्रगती होतांना दिसून येत आहे.

१२. जिल्ह्यात सन २००७-०८ अखेर दवाखाने ८५, रूग्णालये ४८ व प्राथमिक आरोग्य केंद्रें ९६ यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील लोकांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती होऊन त्यांच्या राहणीमानात बदल घडून येत आहे.

१३. सन २०१०-११ यावर्षी भिमाशंकर सहकारी साखर कारखान्यांने १२५८७ सभासद होते तर कारखान्याची एकूण भाग संख्या ३५८०२ होती तर कारखान्याचे एकूण भाग भाडवल १७०६.९८ लाख रूपये होते.

१४. सन २००१-०२ या गळीत हंगामात भिमाशंकर साखर कारखाना १२१ दिवस चालला त्यामध्ये साखर उत्पादन ३७७९३६ क्विंटल तर यावर्षी कारखान्याने ७६० रूपये प्रतिटनाला भाव दिला. सन २०१०-११ चा गळीत हंगाम २३५ दिवस चालला यामध्ये साखर उत्पादन ९१७६४१ क्विंटल झाले तर या हंगामात १८०० रूपये प्रतिटन ऊसाला भाव दिला यावरून भिमाशंकर सहकारी साखर कारखाना मोठी प्रगती केली असून कारखान्याने विविध पुरस्कार प्राप्त केलेले आहेत त्यामध्ये प्रामुख्याने देशातील सर्वोत्कष्ट सहकारी साखर कारखाना सन २००७-०८, २००९-१० आणि २०१०-११ यावर्षी ठरला आहे.

१५. सन २०१०-११ यावर्षी घोडगंगा सहकारी साखर कारखान्यात १८९७० सभासद होते तर कारखान्याचे भाग भांडवल १५३३७३०२२ रूपये एवढे होते.

१६. सन २०१०-११ या गळीत हंगामात घोडगंगा कारखाना २०३ दिवस चालला त्यामध्ये साखर उत्पादन ८.७७ लाख क्विंटल झाले तर कारखान्याने या हंगामात २५०० रूपये प्रतिटनाला ऊसाला भाव दिला. कारखान्याची ही प्रगती मागील काही वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढली आहे असे दिसून येते.

१७. सन २०१०-११ यावर्षी संत तुकाराम कारखान्यात ४३८७ सभासद होते तर कारखान्याचे एकूण भाग भांडवल २२४९८७८९५.५६ रूपये एवढे होते.

१८. सन २०१०-११ यावर्षी संत तुकाराम साखर कारखान्याची गाळप क्षमता २५०० में टन एवढी होती. या हंगामात कारखान्याने ४.८९ में टन ऊसाचे गाळप केले तर कारखान्याला साखर उत्पादन ५.६२ लाख क्विंटल झाले. कारखान्याने आपल्या क्षमतेचा ७५.६२ टक्के वापर केलेला होता असे दिसून आले.

१९. सन २०१०-११ यावर्षी सोमेश्वर सहकारी कारखान्याची गाळप क्षमता २५०० में टन होती. यावर्षी कारखान्याने ऊसाचे गाळप ९.१७ लाख में टन केले त्यापासून कारखान्याला १०.१५ लाख क्विंटल साखर उत्पादन झाले तर उतारा यावर्षी ११.४४ टक्के प्राप्त झाला होता.

२०. सन २०१०-११ या वर्षी राजगड सहकारी साखर कारखान्याची गाळप क्षमता १२५० में. टन होती. यावर्षी कारखान्याने २.११ लाख में. टन ऊसाचे गाळप केले त्यापासून २.२५ लाख क्विटल साखरेचे उत्पादन झाले तर कारखान्याला साखरेचा उतारा १०.६८ टक्के प्राप्त झाला.

२१. सन २०१०-११ यावर्षी विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे १८३०१ सभासद होते त्यांच्याकडे २२००५ भाग होते तर कारखान्याचे एकूण भाग भांडवल ८९०९३००० रूपये एवढे होते. तर कारखान्याची गाळप क्षमता ५००० में टन होती. यावर्षी ११.३२ लाख में. टन ऊसाचे गाळप केले त्यापासून कारखान्याला १२.७२ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले तर कारखान्याला साखर उतारा ११.२३ टक्के प्राप्त झाला होता.

२२. सन २०१०-११ यावर्षी निवडक सहकारी साखर कारखान्यांचा आरोग्य निर्देशांक पुणे जिल्ह्यात सरासरी २१.२८ एवढा होता. तो भिमाशंकर कारखान्याचा १.३५, घोडगंगा कारखान्याचा १.१५, राजगड कारखान्याचा १.०१, सोमेश्वर कारखान्याचा १.१८, संत तुकाराम कारखान्याचा ०.९२ तर विघ्नहर कारखान्याचा आरोग्य निर्देशांक १.२२ असल्याचे

आढळून आले. हा निर्देशांक जर १ पेक्षा कमी येत असेल तर असा साखर कारखाना आजारी समजला जातो.

२३. पुणे जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने सभासदांच्या उन्नतीसाठी माती परिक्षण प्रयोगशाळा, प्रेसमेड व कंपोष्ट खताचा पुरवठा, रासायनिक खतांचा पुरवठा, हिरवळीच्या खतांसाठी ताग-धैंचा बियांचा पुरवठा, रोग कीड व तण नाशकांचा पुरवठा, शेती अवजारांचा पुरवठा, शेतीविषयक मार्गदर्शक पुस्तके व प्रशिक्षण वर्ग, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या वापरा संबंधी संगणक जनजागृती, ऊसाच्या आधुनिक जातींच्या बेण्यांचा पुरवठा, कारखान्यांत उप-उत्पादनांची निर्मिती तसेच कारखाना कार्यक्षेत्रात शैक्षणिक, आरोग्य, वाहतुक, दळणवळण, पशुवैद्यकिय दवाखाना इत्यादीचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा केल्याचे दिसून येते त्यामुळे कारखान्यांच्या प्रगतीत वाढ होऊन कारखान्याशी संबंधीत सर्व घटकांच्या राहणीमानात व जीवनमानात बदल घडून येत आहे असे दिसून येत आहे.

### ७.२.३ कारखान्यांच्या सभासदासंबंधीचे निष्कर्ष

२४. अध्ययनासाठी निवडलेल्या पुणे जिल्ह्यातील निवडक सहकारी साखर कारखान्यांतील ३६० सभासदापैकी सर्वाधिक सभासद खुल्या प्रवर्गातील १२४ (३४.४४ टक्के), इतर मागास वर्गातील १०१ (२९.०६ टक्के) सभासद, भटक्या जाती व जमातीतील ५२ (१४.४४ टक्के) सभासद, अनुसूचीत जमातीतील ४३ (११.९४ टक्के) सभासद तर अनुसूचीत जातीतील ४० (११.११ टक्के) सभासद असल्याचे दिसून आले, यावरून असा निष्कर्ष निघतो की जिल्ह्यातील सभासदात पुढारलेल्या जातीतील सभासदांचे प्रमाण अधिक आहे.

२५. सभासदांमध्ये सर्वाधिक ६० पेक्षा जास्त वय असलेले १०२ (२८.३३ टक्के) सभासद, ३१ ते ४५ व ४६ ते ६० या वयोगटातील प्रत्येकी ८८ (२४.४४ टक्के) सभासद, १५ ते ३० वयोगटातील ६८ (१८.६१ टक्के) सभासद तर १४ वर्षाआतील सभासदांचे प्रमाण १५ (४.१४ टक्के) सभासद दिसून येतात. यावरून असा निष्कर्ष निघतो की साखर कारखान्यांच्या सभासदामध्ये अनुभवी सभासदांचे प्रमाण लक्षणीय आहे.

२६. सभासदामध्ये साक्षर सभासदांचे प्रमाण ३०९ (८५.८३ टक्के) सभासद तर निरक्षर सभासद ५१ (१४.१७ टक्के) असतांना दिसून आले. साक्षर सभासदात सर्वाधिक माध्यमिक पर्यत शिकलेले ९२ (२९.७७ टक्के) सभासद, उच्च माध्यमिक ७२ (२३.६२ टक्के) सभासद,

प्राथमिक शिक्षण घेतलेले ५६ (१८.६२ टक्के) सभासद, पदवीपर्यंत शिकलेले ५४ (१७.४८ टक्के) सभासद तर डिप्लोमा केलेले २६ (८.४१ टक्के) सभासद आढळून आले. कारखान्यामध्ये सर्वाधिक साक्षर सभासद विघ्नहर कारखान्यात ५३ (८८.३३ टक्के) तर सर्वात कमी साक्षर घोडगंगा कारखान्यात ५० (८३.३३ टक्के) सभासद आढळून आले.

**२७.** अध्ययनासाठी निवडलेल्या ३६० सभासद कुटुंबात एकूण २११५ सदस्य होते त्यामध्ये पुरूषांचे प्रमाण १०७६ (५०.८७ टक्के) सदस्य तर स्त्रीयांचे प्रमाण १०३९ (४९.१३ टक्के) होते तर सभासद प्रतिकुटुंब सरासरी ५.८८ सदस्य राहत होते. कारखान्यांनुसार भिमाशंकर कारखान्यात ४.४३ सदस्य, राजगड कारखान्यात ४.४७ सदस्य, घोडगंगा कारखान्यात ६.९२ सदस्य, सोमेश्वर कारखान्यात ६.१५ सदस्य, संत तुकाराम कारखान्यात ६.३० सदस्य तर विघ्नहर साखर कारखान्यात प्रतिकुटुंब सरासरी ६.९८ सदस्य संख्या दिसून आली. यावरून असे लक्षात येते की कारखान्यांच्या सभासद प्रतिकुटुंबाचा आकार फारच मोठा असल्याचे दिसून येते.

**२८.** निवडक कारखान्यांच्या सभासदात शेती असलेल्या सभासदांचे प्रमाण ३२२ (८९.४४ टक्के) तर शेती नसलेली ३८ (१०.५६ टक्के) सभासद होते. शेती असलेल्या एकूण १३३७ एकर शेतजमीन होती. त्यांमध्ये जिरायती जमिनीचे प्रमाण २१.९१ टक्के, बागायती जमिनीचे प्रमाण ४७.३४ टक्के तर पडिक जमिनीचे प्रमाण ३०.७४ टक्के असल्याचे दिसून आले. शेतीच्या प्रमाणाचा अभ्यास करता अल्प भूधारक सभासदांचे प्रमाण २२.३६ टक्के, मध्यम भूधारक ६१.१८ टक्के तर मोठ्या भूधारकांचे प्रमाण १६.४६ टक्के असल्याचे दिसून आले. यावरून जिल्ह्यातील साखर कारखान्यांतील सभासदामध्ये शेतकरी सभासदांचे प्रमाण मोठे असून त्यांच्याकडे बागायती जमिनीचे प्रमाणही मोठे आहे.

**२९.** सभासद कुटुंबाला सन २०१०-११ या वर्षात वार्षिक सरासरी १५४४१९.८३ रूपये उत्पन्न मिळाले. त्यामध्ये शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण ५९.७६ टक्के, शेतमजुरीपासून १.८८ टक्के, नोकरीपासून ३४.१८ टक्के, व्यवसायापासून २.९९ टक्के तर इतर मार्गाने मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण १.२६ टक्के होते. कुटुंबातील प्रतिसदस्य सरासरी वार्षिक २६२६१.८८ रूपये उत्पन्न मिळाले होते. कारखान्यांनुसार भिमाशंकर कारखान्यात कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १९७८६० रूपये ते प्रतिसदस्य ४४६६३.६ रूपये, राजगड कारखान्यात

प्रतिकुटुंब १०४३२९ रूपये तर प्रतिसदस्य २३३३९.८२ रूपये, घोडगंगा कारखान्यात प्रतिकुटुंब सरासरी १४६६८३ रूपये ते प्रतिसदस्य २११९६. ९७ रूपये, सोमेश्वर कारखान्यात प्रतिकुटुंब सरासरी १६३४०७ रूपये ते प्रतिसदस्य २६५७०.२४ रूपये, संत तुकाराम कारखान्यात प्रतिकुटुंब सरासरी १५५५१४ रूपये ते प्रतिसदस्य २४७१६.७१ रुपये तर विघ्नहर कारखान्यात प्रतिकुटुंब सरासरी १५८५२६ रूपये ते प्रतिसदस्य २२७११.४६ रूपये उत्पन्न मिळाले होते असे दिसून आले. यावरून असे लक्षात येते की, सभासद कुटुंबाला मिळालेल्या वार्षिक एकूण उत्पन्नात शेतीपासून मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण अधिक आहे. म्हणजेच कारखान्यांच्या सभासदांना उत्पन्नासाठी शेतीवर अवलंबून रहावे लागते.

**३०.** सन २०१०-११ या आर्थिक वर्षात कारखान्यांच्या सभासद कुटुंबाला सरासरी ५१४३१ रूपये खर्च आला त्यामध्ये सर्वाधिक खर्चाचे प्रमाण शेतीवर ३६.१६ टक्के, अन्नधान्य व किराणा यावर १४.०४ टक्के, कर्जावरील व्याजदर १२.१९ टक्के, व्यसनावरील खर्चाचे प्रमाण ७७.३४ टक्के, शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण ५.१६ टक्के, दवाखान्यावरील खर्चाचे प्रमाण १४.४० टक्के तर इतर बाबीवरील खर्चाचे प्रमाण १०.७१ टक्के दिसून आले. सभासद कुटुंबातील प्रतिव्यक्ती सरासरी ८७४६.८३ रूपये खर्च येत होता. कारखान्यानुसार भिमाशंकर कारखान्यावरील सभासद कुटुंबाचा वार्षिक सरासरी खर्च ४१४४१ रूपये, राजगड कारखान्यावर ४३७०५ रूपये, घोडगंगा कारखान्यावर ५८२६७ रूपये, संत तुकाराम कारखान्यावर ५५५५२ रूपये तर विघ्नहर कारखान्यावरील प्रतिकुटुंबाला सरासरी वार्षिक खर्च ५३२६३ रूपये खर्च होत होता. यावरून पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सभासद कुटुंबाच्या खर्चाचे प्रमाण मोठे असून त्यांना शेती बरोबरच शिक्षण, अन्नधान्य किराणा व दवाखाना यावर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो.

**३१.** सभासदामध्ये बँकेत खाते असणारे ३२९ (९१.२९ टक्के) सभासद तर बँकेत खाते नसणारे ३१ (८.६१ टक्के) सभासद आढळून आले. साखर कारखान्यांनुसार सर्वाधिक बँकेचे सभासद राजगड कारखान्यात ५८ (९६.६७ टक्के) तर सर्वात कमी घोडगंगा कारखान्यातील ५१ (८५ टक्के) सभासद आढळून आले. बँकेत खाते असणाऱ्या सभासदात सर्वाधिक सभासद सहकारी पतसंस्थेत खाते असणारे ८१ (२४.६१ टक्के) सभासद, सहकारी बँकेत खाते असणारे ७९ (२४.०१ टक्के) सभासद तर खाजगी बँकेत खाते असणारे २८ (८.५१ टक्के)

सभासद आढळून आले. यावरून कारखान्यांचे सभासद बँकेविषयी मोठ्या प्रमाणात जागृत असून ते मोठ्या प्रमाणावर आपले आर्थिक व्यवहार बँकेमार्फत करतात असे स्पष्ट होते.

**३२.** सभासदामध्ये कर्जधारक सभासदांचे प्रमाण ३२३ (८९.७२ टक्के) तर कर्ज न घेतलेल्या ३७ (१०.२८ टक्के) सभासद आढळून आले. कारखान्यांमध्ये सर्वाधिक कर्ज घेणारे सभासद राजगड कारखान्यावर ५७ (९५ टक्के) तर सर्वात कमी कर्जधारक सभासद संत तुकाराम कारखान्यावर ५१ (८५ टक्के) आढळून आले. कर्जधारक कुटुंबामध्ये सर्वाधिक कर्जाचे प्रमाण बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाचे प्रमाण ११० (३४.०६ टक्के), कारखान्याचे ८२ (२५.३९ टक्के), सावकारी कर्ज ५१ (१५.७९ टक्के) तर बचतगटाकडील कर्ज ३८ (११.७६ टक्के) सभासद आढळून आले. यावरून साखर कारखान्यातील सभासद मोठ्या प्रमाणावर कर्जाचा आधार घेतात व तोही संस्थात्मक मार्गाने उपलब्ध होणाऱ्या कर्जाचा आधार मोठ्या प्रमाणात घेतात.

**३३.** पुणे जिल्ह्यातील निवडक साखर कारखान्यांनी कारखान्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी उप-उत्पादने सरू करतात त्यामध्ये खत निर्मिती करतात असे म्हणणारे १३० (३६.११ टक्के) सभासद, इथेनॉल ४८ (१३.३३ टक्के), वीज निर्मिती १४३ (३९.७२ टक्के), बगॅस २२० (६१.११ टक्के), मद्य निर्मिती १९२ (५३.३३ टक्के), कागद निर्मिती ३२ (८.८९ टक्के), कच्ची साखर १०४ (२८.८९ टक्के) सभासद तर इतर प्रकारचे उप-उत्पादन घेतात असे ९३ (२५.८३ टक्के) सभासद म्हणतांना आढळून आले. यावरून निवडक साखर कारखान्यांनी आपल्या उत्पादन वाढीसाठी वेगवेळ्या उप-उत्पादनांची निर्मिती करण्यास सुरूवात केली आहे त्यामुळे कारखान्यांना निश्चित असे उत्पन्न ही मिळू लागले आहे.

**३४.** साखर कारखान्यांनी सभासदांच्या उन्नती व कल्याणासाठी काही योजना सुरू केल्या आहेत. त्यामध्ये घरकुल योजना सुरू केली असे म्हणणारे ७४ (२०.५६ टक्के) सभासद, सेवक पतपेढ्या १७८ (४९.४८ टक्के), दुधडेअरी १६१ (४४.७२ टक्के), नालाबांधनी १३८ (३८.३३ टक्के), ठिबक सिंचन १६४ (४५.५६ टक्के), शेततळे १३५ (३७.५० टक्के), ऊसपिक स्पर्धा ५७ (१५.८३ टक्के), के.टी. बंधारे १४३ (३९.७२ टक्के), कृषी अवजारे १८२ (५०.५६ टक्के), ऊसबेणे वाटप १८८ (५२.२५ टक्के), कर्ज वाटप १८८ (४९.४४ टक्के), मातीपरिक्षण १६८ (४६.६७ टक्के), खते व बी-बियाणे १८६ (५१.६७ टक्के),

शैक्षणिक संकुले १०९ (३०.२८ टक्के), व्यायाम शाळा १२३ (३४.१७ टक्के), वाचनालये १३७ (३८.०६ टक्के), साखर वाटप १५६ (४३.३३ टक्के), लाभांश १६२ (४५ टक्के) सभासद तर इतर प्रकारच्या योजना १११ (३०.८३ टक्के) सभासदांच्या मते सुरू केलेल्या आहेत. यावरून असे लक्षात येते की, साखर कारखान्यांनी आपल्या सभासदांच्या ऊस उत्पादन वाढीसाठी वरील प्रकारच्या विविध योजना सुरू केल्याच्या दिसून आल्या आहेत.

**३५.** साखर कारखाना व शासनाने ऊस उत्पादन वाढीसाठी काही योजना सुरू केल्या आहेत. त्यासंबंधी सभासदांच्या मते राष्ट्रीय साखर धोरण जाहीर केल्याने फायदा झाला असे १३१ (३६.३९ टक्के) सभासद, ऊस विकास कार्यक्रम १६२ (४५ टक्के), बायोगॅस ११६ (३२.९२ टक्के), विमा १९७ (५४.७८ टक्के) , वाढीव प्रकल्प निधी १३५ (३७.५० टक्के), कर्जमाफी १८२(५३.३३ टक्के), पाणलोट विकास कार्यक्रम १४८ (४१.११ टक्के), ऊसाच्या नवनवीन जातींचे संशोधन १३६ (३७.७८ टक्के), शेतकरी प्रशिक्षण योजना १३१ (३६.३९ टक्के) तर इतर प्रकारच्या योजना सुरू केल्या आहेत असे मत मांडणारे ९० (२५ टक्के) सभासद आढळून आले यावरून कारखाना व शासन यांनी सुरू केलेल्या विविध योजनांमुळे ऊस उत्पादन वाढीच्या योजनामुळे ऊसाच्या उत्पादनात वाढ होऊन एकुणच सभासद शेतकऱ्यांच्याही उत्पन्नात वाढ होऊन राहणीमान पातळीत बदल घडून येत आहे.

**३६.** कारखान्यासंबंधी सभासदांच्या काही अडचणी प्रामुख्याने दिसून आल्या त्यामध्ये योग्य ऊस दर न मिळणे अशी अडचण सांगणारे २३३ (६२.७२ टक्के) सभासद, ऊसतोड वेळेवर होत नाही असे म्हणणारे १५९ (४४.१७ टक्के), हप्ता मिळत नाही १४१ (३९.१७ टक्के), कल्याणकारी योजानांचा लाभ न मिळणे १०६ (२९.४४ टक्के), अयोग्य माती परिक्षण १९२ (५३.३३ टक्के), शैक्षणिक सोयीचा अभाव १०४ (२८.८९ टक्के) तर कारखान्यांकडून कर्ज उपलब्ध होत नाही असे म्हणणारे १५३ (४२.५० टक्के) सभासद आढळून आले. यावरून कारखान्यांच्या सभासदांना मोठ्या प्रमाणात वरील प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते असे स्पष्ट होते.

**३७.** कारखाना कार्यक्षेत्रातील अवर्षण प्रवण किंवा दुष्काळी भागातील सभासदांना ऊस लागवडी करीता प्रोत्साहन देण्यासाठी कारखान्यांनी काही योजना सुरू केल्या आहेत असे म्हणणारे २८६ (७८.४४ टक्के) सभासद तर योजना सुरू केल्या नाहीत असे म्हणणारे ७४ (२०.५६

टक्के) सभासद दिसून आले. सभासदांकरीता सुरू केलेल्या योजनामध्ये प्रामुख्याने तुषार सिंचन २२६ (७८.०२ टक्के), ठिंबक सिंचन २२७ (७८.३७ टक्के), के.टी. बंधारे २२५ (७८. ६७ टक्के), शेततळे १९२ (६७.१३ टक्के), नाला बंदी व बाध बांधणी १६० (५५.९४ टक्के), पाणलोट विकास कार्यक्रम १५२ (५३.१५ टक्के) तर माती परिक्षणाची सुविधा मिळाली असे म्हणणारे १६५ (५७.६९ टक्के) सभासद आढळून आले. यावरून कारखान्यांनी दुष्काळी भागातील सभासदांसाठी मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन वाढीसाठी योजना राबवतांना दिसून येतात.

**३८.** सभासद कारखान्यांकडून काही अपेक्षा ठेवतात त्यामध्ये प्रामुख्याने अपेक्षा व्यक्त करणारे ३१५ (८७.५० टक्के) सभासद तर कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवणारे ४५ (१२.५० टक्के) सभासद आढळून आले. अपेक्षा असलेल्या सभासदांच्या मते कारखान्याने शैक्षणिक सुविधा सुरू कराव्यात असे मत मांडणारे २१८ (६०.५६ टक्के) साभसद, सामुहिक विवाहाचे आयोजन २११ (५८.६१ टक्के), आधुनिक कृषी अवजारांचे वाटप २०० (५५.५६ टक्के), जागतिक बाजराची माहिती १८३ (५०.८३ टक्के) तर इतर प्रकारच्या अपेक्षा व्यक्त करणारे ७९ (२१.९४ टक्के) सभासद आढळून आले. यावरून कारखान्यांचे सभासद आपल्या कारखान्यांकडून विविध प्रकारच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात करतात असे दिसून येते.

### ७.२.४ कारखान्यांतील कायम व हंगामी कामगांरासंबंधीचे निष्कर्ष

**३९.** पुणे जिल्ह्यातील निवडक सहा साखर कारखान्यातील १८० कायम व ट्रेनी कामगारांकडून प्रश्नावलीच्या साह्याने माहिति मिळवली तीचे विश्लेषण केले. त्यानुसार त्यांच्या जातींचा अभ्यास केला असता सर्वाधिक खुल्या गटातील ८४ (४६.६७ टक्के) कामगार, इतर मागास वर्गातील ५१ (२८.३३ टक्के), भटक्या जाती व जमातीतील १४ (७.७८ टक्के), अनुसूचित जातीतील १६ (८.८९ टक्के) कामगार तर अनुसूचित जमातीतील कामगारांचे प्रमाण १५ (८.३३ टक्के) असल्याचे आढळून आले. यावरून कारखान्यांमध्ये कायम व ट्रेनी कामगार असलेल्या मध्ये उच्च जातीतील कामगारांचे प्रमाण अधिक आहे.

**४०.** एकूण १८० कामगारात सर्वाधिक ३१ ते ४५ वयोगटातील ७५ (४१.६७ टक्के) कामगार, ४६ ते ६० वयोगटातील ४८ (२६.६७ टक्के), १५ ते ३० वयोगटातील ३९ (२१.६७ टक्के)

तर ६० पेक्षा जास्त वय असलेले १८ (१० टक्के) कामगार दिसून आले तर १४ वर्षाखालील वयोगटातील एकही कामगार कारखान्यांत काम करतांना दिसून आला नाही.

४१. अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण १८० कामागारात कायम कामगारांचे प्रमाण १४८ (८२.२२ टक्के), ट्रेनी कामगार २८ (१५.५६ टक्के) तर इतर प्रकारच्या कामगारांचे प्रमाण ४ (२.२२ टक्के) असल्याचे दिसून आले. यावरून कारखान्यात दैनंदिन कामासाठी हंगामी कामगारांपेक्षा कायम कामगार कामावर ठेवले जातात असे लक्षात येते.

४२. कारखान्यांच्या कायम कामगारात साक्षर कामगारांचे प्रमाण १६६ (९२.२२ टक्के) तर निरक्षतेचे प्रमाण १४ (७.७९ टक्के) असल्याचे दिसून आले. साक्षर कामगारात सर्वाधिक उच्च माध्यमिक पर्यंत शिकलेले ४६ (२७.७१ टक्के), पदवीपर्यंत शिकलेले २९ (१७.४७ टक्के) तर डिप्लोमा केलेल्या कामगारांचे प्रमाण १७ (१०.२४ टक्के) एवढे दिसून आले. यावरून कारखान्याच्या कायम कामगारात साक्षरतेचे प्रमाण मोठे असून त्यांच्या अंगात कौशल्य असल्याचे दिसून येते.

४३. कारखान्यांतील एकूण कायम कामगारांना दरमहा सर्वाधिक १५००१ ते २०००० रूपये वेतन मिळणारे ५७ (३१.६७ टक्के) कामगार, १०००१ ते १५००० रुपये वेतन मिळणारे ५२ (२८.८९ टक्के) कामगार, ५००१ ते १०००० रूपये वेतन मिळणारे ३६ (२० टक्के) कामगार तर २०००० रूपया पेक्षा अधिक वेतन मिळणारे २५ (१३.८९ टक्के) कामगार तर ५००० रूपयापेक्षा कमी दरमहा वेतन मिळणारे १० (५.५६ टक्के) कामगार दिसून आले. यावरून कायम कामगारांना दरमहा सरासरी १५००० ते २०००० रूपया पर्यंत वेतन मिळत होते.

४४. कारखान्यांनी कायम कामगारांसाठी काही विविध सेवा-सविधा पुरवल्या होत्या त्यामध्ये सर्वाधिक कर्जाचे वाटप ११४ (८३.३३ टक्के) सभासद, रस्ते बांधणे ११३ (६२.७८ टक्के), शाळा व वाचनालये प्रत्येकी ९० (५० टक्के), सेवक पतपेढ्या ९३ (५१.६७ टक्के), घरकुल योजना ८८ (४८.८९ टक्के), व्यायाम शाळा ८३ ( ४६.११ टक्के), निवृत्ती वेतन ५८ (३२.२२ टक्के) तर इतर प्रकारच्या योजना सुरू केल्या असे म्हणणारे २४ (१३.३३ टक्के) कामगार आढळून आले. यावरून असे लक्षात येते की, साखर कारखाना आपल्या कायम कामगारांचा कामाचा उत्साह टिकून राहण्यासाठी व त्यांच्या कल्याणासाठी मोठ्या प्रमाणावर विविध योजना कारखाना कार्यक्षेत्रात राबवतात असे दिसून येते.

### ७.२.५ कारखान्यांतील ऊसतोड व वाहतूक मजुरांसंबंधीचे निष्कर्ष

**४५.** पुणे जिल्ह्यातील निवडक साखर कारखान्यांतील अध्ययनासाठी निवडलेल्या १८० ऊसतोड मजुरांमध्ये डोके सेंटर प्रकारातील मजुरांचे प्रमाण ८१ (४ टक्के), गाडी सेंटर प्रकारातील ५४ (३० टक्के) तर डायरेक्ट गाडी सेंटर प्रकारातील ४५ (२५ टक्के) असल्याचे दिसून आले. यावरून ऊसतोड मजुरांमध्ये प्रामुख्याने तीन प्रकार पडतात असे दिसून येते.

**४६.** अध्ययनासाठी निवडलेल्या १८० ऊसतोड मजूर कुटुंबात एकूण ८३५ सदस्य होते त्यामध्ये पुरूषांचे प्रमाण ४२२ (५०.६५ टक्के) तर स्त्रीयांचे प्रमाण ४१३ (४९.५८ टक्के) होते. ऊसतोड मजूर प्रतिकुटुंबात सरासरी ४.६४ सदस्य राहत होते. एकूण सदस्यात प्रत्यक्ष ऊसतोडणीचे काम करणारे ६९४ सदस्य आढळून आले. त्यामध्ये पुरूषांचे प्रमााण ३५० (५१.१७ टक्के) तर स्त्रीयांचे प्रमाण ३३४ (४८.८६ टक्के) होते. प्रतिकुटुंब सरासरी प्रत्यक्ष ३.८० सदस्य काम करत होती. ते भिमाशंकर कारखान्यावर ४.५ सदस्य, राजगड कारखान्यवर ४.२३ सदस्य, घोडगंगा कारखान्यावर ४ सदस्य, सोमेश्वर कारखान्यावर ३.४७ सदस्य, संत तुकाराम कारखान्यावर ३.८३ सदस्य तर विघ्नहर कारखान्यावर प्रतिकुटुंब सरासरी २.७७ सदस्य प्रत्यक्ष ऊसतोडणीचे काम करतांना दिसून आले. यावरून असे लक्षात येते की ऊसतोड मजूर कुटुंबाचा आकार मोठा असून प्रत्यक्ष काम करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे असे स्पष्ट होते.

**४७.** अध्ययनासाठी निवडलेल्या ऊसतोड मजुरात सर्वाधिक ऊसतोड मजूर खुल्या प्रवर्गातील ६५ (३६.११ टक्के) मजूर, इतर मागास वर्गातील ४४ (२४.४४ टक्के), भटक्या जाती व जमातीतील २१ (११.६७ टक्के), अनुसूचित जातीतील २६ (१४.४४ टक्के) मजूर तर अनुसूचित जमातीतील २४ (१३.३३ टक्के) मजूर आढळून आले. यावरून असे लक्षात येते की, ऊसतोड मजुरात खुल्या प्रवर्गाच्या तुलनेत इतर मागास जातीतील ऊसतोड मजुरांचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट होते.

**४८.** ऊसतोड मजुरात साक्षरतेचे प्रमाण ८८ (४९.८९ टक्के) तर निरक्षरतेचे प्रमाण ९२ (५१.११ टक्के) होते. साक्षर मजुरात प्राथमिक शिक्षण घेतलेले ६८ (७७.२७ टक्के), माध्यमिक शिक्षण घेतलेले ११( १२.५० टक्के) तर पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले २ (२.२७ टक्के) मजूर आढळून आले. यावरून असे लक्षात येते की ऊसतोड मजुरात साक्षरतेचे प्रमाण कमी असून त्यामध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण अती अल्प असल्याचे दिसून येते.

४९. ऊसतोड मजुरांच्या वयोगटाचा विचार केला असता सर्वाधिक ऊसतोड मजूर ३१ ते ४५ या वयोगटातील ६१ (३३.८९ टक्के) मजूर, ४६ ते ६० वयोगटातील ५६ (३१.११ टक्के) मजूर, १५ ते ३० वयोगटातील ४० (२२.२२ टक्के) मजूर, ६० पेक्षा जास्त वय असलेले २१ (११.६७ टक्के) मजूर तर १४ वर्षापेक्षा कमी वयातील मजुरांचे प्रमाण २ (१.११ टक्के) मजूर असल्याचे आढळून आले. यावरून असा निष्कर्ष निघतो की, ऊसतोड मजुरात ३१ ते ६० या वयोगटातील मजुरांचे प्रमाण लक्षणीय असून वय झालेल्या मजुरांबराबरच बाल मजुरांचे प्रमाणही दिसून येते.

५०. ऊसतोड मजूर ऊसतोडणीचे काम नेमके कोणत्या कारणांनमुळे स्वीकारतात त्यामध्ये सर्वाधिक प्रमाण गावी मजुरीचा अभाव ९६ (५३.३३ टक्के), कर्जफेडीसाठी ८९ (४९.४४ टक्के), शेतीनाही ७८ (४३.३३ टक्के), जोड उत्पन्न ७३ (४०.५६ टक्के), निरक्षतेमुळे ६७ (३७.२२ टक्के ), आवड असल्यामुळे ३६ (२० टक्के) मजूर तर इतर कारणांमुळे ५६ (३१.११ टक्के) मजुरांनी हा व्यवसाय स्वीकारला होता. यावरून असे लक्षात येते की, ऊसतोड हा व्यवसाय स्वीकारण्यामागे प्रामुख्याने गावी मजुरीचा अभाव, शेती नाही, निरक्षरता, कर्जपरतफेड व आवड या कारणामुळे तसेच अंगात कौशल्य राहत नाही त्यामुळे त्यांना ऊसतोडणीचे शारीरिक कष्टाचे काम करावे लागते.

५१. अध्ययनासाठी निवडलेल्या उसतोड मजुरांपैकी सर्वाधिक ६ ते १० वर्षापासून हा व्यवसाय करणारे ४५ (२५ टक्के) मजूर, १ ते ५ वर्षापासून ४४ (२४.४४ टक्के) मजूर, पहिलेच वर्ष असलेले ३३ (१८.३३ टक्के) मजूर, ११ ते १५ वर्षापासून २५ (१३.८९ टक्के) मजूर, १६ ते २० वर्षापासून १५ (८.३३ टक्के) मजूर तर २० वर्षापेक्षा जास्त काळापासून हा व्यवसाय करणारे १८ (१० टक्के) मजूर कुटुंबे आढळून आली. यावरून असे लक्षात येते की ऊसतोड मजूर पिढ्यानपिढ्या हा व्यवसाय सतत कमी वेतन व अधिक स्वरूपाचे काम असले तरी दरवर्षी या व्यवसायात प्रवेश करणाऱ्या मजुरांच प्रमाणही लक्षणीय असल्याचे दिसते. यावरून ऊसतोड मजुरांना या कामाचा फारच अनुभव आहे तसेच अनुभवी मजुरांना मागणी ही मोठी राहते असे स्पष्ट होते.

५२. उसतोड मजूर प्रतिदिन किती तास काम करतात त्यामध्ये सर्वाधिक ९ ते ११ तास काम करणारे ५१ (२८.३३ टक्के), ६ ते ८ तास काम करणारे ४६ (२५.५६ टक्के), १२ ते १४ तास काम करणारे ३४ (१८.८९ टक्के), १४ ते १६ तास काम करणारे २२ (१२.२२ टक्के) तर

प्रतिदिन १६ तासापेक्षा अधिक वेळ काम करणारे २७ (१५ टक्के) मजूर प्रतिदिन काम करतांना आढळून आले. यावरून ऊसतोड मजुरांना प्रतिदिन सरासरी १५ तास काम करावे लागते व त्यामानाने मिळणारा मोबदला हा अतिशय अल्प स्वरूपाचा आहे.

**५३.** ऊसतोड मजुरांना हंगाम काळात किती महिने काम मिळते त्यामध्ये सर्वाधिक ६ ते ८ महिने काम मिळालेले ८३ (४६.११ टक्के) मजूर, ४ ते ६ महिने काम मिळालेले ५६ (३१.११ टक्के), २ ते ४ महिने काम मिळालेले २४ (१३.३३ टक्के) तर ८ महिन्यांपेक्षा जास्त काम मिळालेले १५ (८.३३ टक्के) मजूर आढळून आले. यावरून ऊसतोड मजुरांना साधारणपणे वर्षभरात सरासरी ७ ते ८ महिने ऊसतोड व वाहतूकीचे काम उपलब्ध होते असे दिसून येते तर उर्वरित कालखंडात ऊसतोड मजूर घरी बसुनच आपला वेळ घालवतात व मुकादमाकडून उचल घेऊन आपला चरितार्थ भागवतात व कर्जबाजारी होतात.

**५४.** ऊसतोड मजुरांनी केलेल्या कामाचा मोबदल नेमका कोणामार्फत मिळाला त्यामध्ये सर्वाधिक मुकादमामार्फत ९२ (५१.११ टक्के) मजुरांना, कारखान्यांकडून ४२ (२३.३३ टक्के) मजुरांना, रोख स्वरूपात २७ (१५ टक्के) मजुरांना, इतर मार्गाने १७ (९.४४ टक्के) मजुरांना तर सर्वात कमी २ (१.११ टक्के) बँकेकडून मोबदला मिळाला होता. यावरून असा निष्कर्ष निघतो की, ऊसतोड मजुरांना कामाच्या मोबदल्यासाठी मुकादमावर अवलंबुन राहवे लागते.

**५५.** अध्ययनासाठी निवडलेल्या ऊसतोड मजूर कुटुंबाला गळीत हंगाम सन २०१०-११ यावर्षी एकूण वार्षिक सरासरी ४३६८६.५० रूपये उत्पन्न मिळाले. त्यामध्ये सर्वाधिक ऊसतोडणीपासून मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण ७.४३ टक्के, वाढे विक्रीपासून १०.२४ टक्के, शेतीपासून ८.२१ टक्के, शेतमजुरीपासून ६.६५ टक्के तर इतर मार्गाने मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण ४.४७ टक्के होते. कुटुंबातील प्रतिसदस्य सरासरी वार्षिक ११४९६.४४ रूपये उत्पन्न मिळाले होते. कारखान्यानुसार प्रतिकुटुंब सरासरी वार्षिक भिमाशंकर कारखान्यावर ४५६५४ रूपये, राजगड कारखान्यावर ४२०९३ रूपये, घोडगंगा कारखान्यावर ३६५१३ रूपये, सोमेश्वर कारखान्यावर ५४२५५ रूपये, संत तुकाराम कारखान्यावर ४४३१४ रूपये तर विघ्नहर कारखान्यावर ४८२९० रूपये उत्पन्न मिळाले होते. यावरून ऊसतोड मजुरांना मिळणारे उत्पन्न अतिशय कमी आहे.

**५६.** ऊसतोड मजुरांना साखर कारखान्याकडून मिळालेल्या सेवा-सुविधामध्ये येण्या-जाण्याचा खर्च मिळालेली ८१.६७ टक्के, उचल मिळालेली ८४.४४ टक्के, कोपीचे साहित्य मिळालेली

८२.२२ टक्के, अड्यावर विजेची सोय ८२.७८ टक्के, पिण्याचे पाणी ८१.६७ टक्के, शौंचालयाची सोय २२.२२ टक्के, दवाखाना ७७.२२ टक्के, पशुवैद्यकिय दवाखाना ८५.५६ टक्के, विमा ७८.३३ टक्के, क्रासिंग ६९.४४ टक्के, रेशन दुकान ६२.७८ टक्के, बक्षीस ६३.३३ टक्के, टायरगाडी ६८.८९ टक्के, ऊसोडणीचा योग्य भाव ६६.११ टक्के, रखवालदार ४१.११ टक्के, पाळणाघर १३.८९ टक्के, करमणुक कार्यक्रम ११.६७ टक्के, साखर शाळा ४२.२२ टक्के तर इतर प्रकारच्या १६.११ टक्के सुविधा ऊसतोड मजुरांना मिळत असल्याचे दिसून आले. यावरून कारखाने ऊसतोड मजूर आपल्याकडे टिकून राहवे यासांठी काही प्रमाणात सेवा-सुविधा पुरवितात असे स्पष्ट होते.

**५७.** अध्ययनासाठी निवडलेल्या ऊसतोड मजुरात कर्ज घेतलेल्या मजुरांचे प्रमाण १५३ (८५ टक्के), दारिद्र्यरेषेचे कार्ड असलेली ७७ (४२.७८ टक्के), मतदान कार्ड असलेली १५२ (८४.४४ टक्के) तर व्यसनाधिन मजुरांचे प्रमाण १३९ (७७.२२ टक्के) असल्याचे आढळून आले. यावरून ऊसतोड मजुरात कर्जबाजारी व व्यसनाधिन मजुरांचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट होते.

**५८.** ऊसतोड मजूर कुटुंबांना साखर कारखान्यांविषयी समस्या होत्या. त्यामध्ये सोई-सुविधांचा अभाव ९४ (५२.२२ टक्के), विम्याचा मोठा हप्ता ८८ (४८.८९ टक्के), रेशन दुकान नाही ९१ (५०.५६ टक्के), भरपाई न मिळणे ७१ (३९.४४ टक्के), पुरेसे काम न मिळणे ८९ (४९.४४ टक्के), टायरभाडे जादा ८१ (४५ टक्के) तसेच इतर प्रकारच्या समस्या ५१ (२८.३३ टक्के) कुटुंबांना मोठ्या प्रमाणात भेडसावत होत्या.

**५९.** दोन्ही राज्यातील ऊसतोड मजूर कुटुंबांना ऊसतोडणी व्यवसायासंबंधी समस्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांकडून त्रास होणे ५२ (२८.८९ टक्के), शेतकरी वाढ्यात वाटेकरी १०१ (५६.११ टक्के), रस्ता करावा लागणे ८६ (४७.७८ टक्के), साहित्य न मिळणे ८५ (४७.२२ टक्के), गाडी लवकर खाली न होणे ९५ (५२.७८ टक्के), मुकादमांकडून त्रास ७६ (४२.२२ टक्के) व इतर प्रकारच्या समस्या ५६ (३१.११ टक्के) अधिक प्रमाणात भेडसावत होत्या. यावरून ऊसतोड मजुरांना ऊसतोड व्यवसायासंबंधी मोठ्या प्रमाणात समस्यांना तोंड द्यावे लागते, असे स्पष्ट होते.

## ७.३ प्रमुख शिफारशी

### ७.३.१ साखर कारखान्यांसंबंधी शिफारशी

१) कारखान्याने व संचालक मंडळ आणि अधिकारी वर्गाने एकत्र येऊन साखरेबरोबर इतर उप-पदार्थ निर्मितीचा सखोल अभ्यास करून बगॅस, अल्कोहोल, वीजनिर्मिती, खते, रेक्टिफाईड स्पिरीट, बायोफर्टिलायझर (जैविक खते), कंपोस्ट खत, उत्पादित होणाऱ्या वाफेचा वीज निर्मितीसाठी उपयोग करून द्यावा.

२) कारखान्याने शासनाच्या मदतीने वैद्यकीय, पशुवैद्यकीय, ठिबक सिंचन संच, बंधारे, शेततळी, रस्ते दुरुस्ती, स्वस्त दरात किराणा माल, शैक्षणिक सोय, शैक्षणिक फी सवलत, प्रशिक्षण, सहली, मेळावे इ. सोयी शेतकऱ्यांना पुरावाव्यात.

३) साखर कारखान्यांनी साक्षरता प्रसार करण्यासाठी शैक्षणिक संकुले, ग्रंथालये, व्यवस्थापन कोर्सेस, संगणक शिक्षण, इंटरनेटचा वापर, पिण्याच्या पाण्याची सोय, सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन आणि सांस्कृतिक कार्यक्रम व राष्ट्रीय सण साजरे करावेत. ज्यामुळे समाज, शेतकरी, कामगार यांमधील परस्पर संबंध सुधारतील.

४) स्वत:च्या मुल्यवर्धित (Value Added) प्रकल्प तयार करावा, रावळगाव शुगर फॅक्टरीने स्वत:ची साखर वापरून कन्फेक्शनरी उद्योग सुरू करून गोळ्या, बिस्किटे, चॉकलेट, शीतपेय इत्यादी तयार करून १५० रूपये ते ३०० रूपये प्रति किलो किंमत मिळवली अशा प्रकारचा प्रयोग प्रत्येक कारखान्याने सुरू करावा.

५) वारणा उद्योग समुहाने जि. कोल्हापूर यांनी प्रेसमड मधून कार्बनडाय ऑक्साईड व हायड्रोजन सल्फाईड हे दोन पदार्थ बाजुला काढून अती उच्च दर्जाचा ९६ टक्के शुध्द बायोगॅसची वाहणांनसाठी निर्मिती केली आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६०० लाख मे. टन ऊस गाळपापासून २१ लाख मे. टन प्रेसमडचा इंधन म्हणून वापर केल्यास ८ कोटी लिटर इंधन तयार होईल व पर्यावरण प्रदुषणास आळा बसेल तसेच कार्बन क्रेडीटच्या नावाखाली कोट्यावधी रूपयांचे अनुदान कारखान्यांना मिळेल त्यामुळे कारखान्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल.

६) ऊसातील ६०-७० टक्के वाया जाणाऱ्या पाण्याचा वापर करून खनिजयुक्त पाणी (मिनरल वाटर), बर्फ, हॅलोजेनेटेड साखर (दिडशेपट गोड), ऊसाचा रस यांची निर्मिती करावी

त्यामुळे कारखान्याचे स्वत:चे उप-उत्पादन तयार होऊन निश्चित उत्पन्नाचे साधन तयार होईल.

७) आजारी साखर कारखान्यांसाठी कर्जरोखे, शेअर्स विक्री करून आर्थिक पुरवठा करावा, आर्थिक समस्या दूर कराव्यात त्यामुळे आजारी कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी व मजुरांस आर्थिक उत्पन्न मिळेल.

८) सध्या अस्तित्त्वात असलेले कारखाने पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी ऊस क्षेत्र वाढवावे व नवीन कारखाने चालू करण्याची परवानगी द्यावी, कारण १०-११ महिने कारखाने चालू राहण्यासाठी प्रयत्न करता येईल. ज्यामुळे हंगामी कामगारांचा प्रश्न सोडविता येईल.

९) आंध्रप्रदेश, तामिळनाडू राज्यात वर्षभर साखर कारखाने चालू राहतात. उत्पादन खर्च कमी होऊन साखर कारखाने फायद्यात चालतील. दक्षिण आफ्रिका, ब्राझील या देशात लहान शेतकरी शेतात अनेक वर्षे ऊसाचे पीक घेतात. एकाच वेळी ऊसाचे पीक न तोडता परिपक्व ऊस प्रत्येक महिन्याला तोडणी करून कारखान्याला पाठवितात त्यामुळे वर्षभर ऊस कारखान्याला पुरवठा करता येईल.

१०) फक्त ऊसापासून साखर तयार न करता बीट, पांढरी ज्वारी, शर्कराकंद इ. गोडयुक्त उत्पादन घेण्यास कारखाना व शासनाने शास्त्रशुद्ध तंत्र विकसित करावे व यावर संशोधन व्हावे.

११) कारखान्याने ऊस तोड मजुरांची दिवसेन्दिवस कमतरता भासणार आहे. त्यासाठी ऊस तोडणी यंत्र, ट्रॅक्टर, यांत्रिक किटकनाशक फवारणी यंत्रे, रिजर, बहादूर नं. १ नांगर, सायन कुळव, रोटाव्हेटर, सबसॉयलर, कृषिराज बहुगुणी औजार, लोडर, चॉपर, हार्वेस्टर, ट्रॉलीज, इ. यांत्रिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण द्यावे. कारखान्यांनी आधुनिक अवजारे पुरवावित.

१२) कारखान्यांनी केंद्र पुरस्कृत ऊस विकास कार्यक्रमांतर्गत शासनाच्या मदतीने सन २००८ पासून उती संवर्धन (Tissue Culture) तंत्राचा वापर, त्रिस्तरीय बेणे (Three Tier Seeds) म्हणजेच मूलभूत बेणे, पायाभूत बेणे व प्रमाणित बेणे पुरविण्यात येते व लवकर ऊसाच्या बेण्याचे गुणन करण्यात येते. याची सखोल माहिती शेतकऱ्यांना देण्यात यावी.

१३) ऊसापासून फक्त साखर उत्पादन न करता उप-पदार्थांची निर्मिती करावी की ज्यामुळे वर्षभर साखर कारखाने चालू राहतील. उदा. डिस्टलरी प्रकल्प, बायोअर्थ, खते, स्पिरीट, इथेनॉल, सीओटू, अर्कशाळा, कागद, वीजनिर्मिती, इ.

१४) कारखान्याने शेतकऱ्यांसाठी विविध प्रकल्प राबवितात आणि जोड व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन व अर्थसाहाय्य करावे, जेणेकरून ऊस उत्पादकांना आर्थिक पाठबळ मिळेल.

१५) घोडगंगा सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांसाठी बैलजोडी, इलेक्ट्रिक मोटार, ट्रॅक्टर, ट्रक, ट्रॉली, ट्रेलर, मोटारसायकल, मोबाईल, वॉशिंग मशीन, टिलर इ. पुरविले. सोमेश्वर, विघ्नहर, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यांनी हमीपत्रे लिहून घेऊन १ लाखापर्यंत अर्थसाहाय्य करावे.

१६) संत तुकाराम व भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यांनी मुरूम टाकणे, साईड गटर, डांबरीकरण, वृक्षारोपण, वेबसाईट व संगणक प्रणाली, इंटरनेट, कापड, सलून, लॉन्ड्री, शिंपी, चांभार, हॉटेले, किराणा माल, सुतार, लोहार, पिठाची गिरणी इ. दुकाने सुरू करून द्यावी व अर्थ साहाय्य करावे.

१७) केंद्र सरकारने सी. रंगाराजन समितीच्या ५ ऑक्टोबर २०१२ शिफारशीनुसारर लेव्ही साखरेचे बंधन रद्द केल्यास (त्रैमासिक कोटा) तर साखर उद्योगाचे होणारे ३००० कोटी रुपये नुकसान होणार नाही. त्यामुळे त्रैमासिक कोटा पद्धत बंद करावी अशी शिफारस करण्यात आली.

१८) साखर उद्योग सक्षम करणे, साखर उद्योग मुक्त (नियंत्रण मुक्ती) करावा. सोबत या उद्योगात वायदे बाजाराचा वापर, कंत्राटी शेतीचा अवलंब व आकारमान वाढवण्याचे सकारात्मक उपायांची जोड द्यावी.

१९) देशातील सुमारे ५ कोटी ऊस शेतकऱ्यांना आधार देणारा व जागतिक स्तरावर (ब्राझीलनंतर) दुसऱ्या क्रमांकावर असणारा, ८० हजार कोटी मूल्यवर्धित निर्मितीचा साखर उद्योग शासनाच्या काटेरी मुकुटातून व नियमातून मुक्त करावा.

२०) साखर उद्योगाला अनेक प्रकारची नियंत्रण लागू आहेत. त्यामागे उद्योगाच्या विकासाचे, सामाजिक न्यायाचे, शेतकऱ्यांच्या हिताचे, ग्राहकांच्या लाभाचे, आर्थिक व राजकीय गणित होते म्हणून साखरेला जिवनावश्यक वस्तू ठरविण्याची शिफारस शासनानी मान्य करावी.

२१) लेव्ही साखरेचे बंधन, साखर उताऱ्यावर आधारित किमान वैधानिक किंमत केंद्र सरकार राज्य शासनाच्या मार्फत ठरवित असते. ही किंमत (एस.ए.पी.) पद्धतीने साखर उद्योग स्वीकारत होते. हे बंधन बंद करण्यात यावे व खुल्या बाजारभावाने साखरेची विक्री व्हावी अशी शिफारस करण्यात आली आणि यावी.

२२) नवीन साखर कारखाना सुरू करण्यासाठी १५ किलोमीटरचे बंधन, कारखाना क्षेत्रात फक्त ऊस विकण्याचे बंधन, साखर ज्यूटच्या पोत्यातून विकण्याचे बंधन, मोलॅसिस विक्रीवर बंधन, निर्यातीवर बंधन अशा वेगवेगळ्या बंधनातून साखर उद्योग मुक्त करण्याची शिफारस करण्यात आली.

२३) साखर कारखाना क्षेत्रात ऊस विक्रीचे बंधन रद्द करावे, साखर उत्पादनासोबत तयार होणाऱ्या मोलॅसिस, प्रेसमड, बगॅस, खते कवडीमोल दराने विकली जातात. यासाठी उप-उत्पादनाला राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करणे, कारखान्यातून निर्माण होणारी वाफ पूर्णपणे सहवीज निर्मितीसाठी वापरण्याचे तंत्र विकसित करणे अशा शिफारशी करण्यात आल्या.

## ७.३.२ कारखान्यांच्या सभासदासंबंधीच्या शिफारशी

१) साखर उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान आत्मसाद करणे, आधुनिक शेती व अवजारे, ऊस शेती व्यवस्थापनाचे वेळापत्रक समजणे सोपे जाईल यासाठी कृषी प्रशिक्षण व संगणक प्रशिक्षणाची गरज आहे.

२) सभासदांना आधुनिक अवजारे टीलर, हार्वेस्टर, ठिबक व तुषार सिंचन संच या सारख्या विविध साधनांचा वापर करावा व त्यासाठी कारखान्याकडून आर्थिक पाटबळ मिळवावे.

३) शेती, आरोग्य, शिक्षण व व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी जास्त पैशांची गरज आहे त्यासाठी कारखान्यांनी व शासनाने सुरू केलेल्या कल्याणकारी उपाययोजनाचा प्रभावीपणे वापर केला पाहिजे.

४) शेतकऱ्यांनी अधिक ऊस उत्पादनासाठी त्रिस्तरीय खते (नत्र, स्फुरद, पालाश) व सेंद्रिय आणि द्रवरूप जैविक खते Bio-Fertiliser (निसोरा) वापरावीत त्यामुळे ऊस उत्पादनात वाढ होईल.

५) सुधारित ऊस बेणे वापरताना ऊस विकास कार्यक्रम अंतर्गत पायाभूत, प्रमाणित, मूलभूत आणि ऊती संवर्धन ऊस बेणे व सुधारित जातीची लागवड करावी आणि योग्य खताची वेळेवर मात्रा दिल्यास ऊस उत्पादनात दुप्पट वाढ होण्यास मदत होते म्हणून त्याचा वापर करावा.

६) सभासदांनी कारखान्यांच्या विविध सभामध्ये उपस्थीत राहून वेळोवेळी मार्गदर्शन करावे, कारखान्याची कार्यपध्दती समजून घ्यावी व स्वहितासाठीच्या विविध योजनांची माहिती करून घ्यावी.

### ७.३.३ कारखान्यांतील कायम व हंगामी कामगारांसंबंधी शिफारशी

१) गॅप लिव्ह इनकॅशमेंट योजना शासनाने व कारखान्यांनी सुरू कराव्यात. त्यांचा फरक रोख स्वरूपात द्यावा.

२) शासन व कारखाना व्यवस्थापनात कामगार / कर्मचारी वर्गाचा एक प्रतिनिधी असावा.

३) सन १९४६ च्या औद्योगिक संबंध कायदा लागू करावा.

४) अकुशल कामगारांचे वेतन निश्चित करावे.

५) कंत्राटी कामगार कायदा १९७० लागू करावा.

६) हरिजन समाज भवन, सामुदायिक विवाह, क्रीडा साहित्य, कामगार भवन, इ. सुविधा, सोई शासनाने द्याव्यात.

७) शैक्षणिक, संगणक प्रशिक्षण व मोफत दरात वसतिगृहे योजना लागू करावी.

८) घरगुती साधने सवलतीच्या दरात द्यावी. धान्य व वाहतूक साधने स्वस्त दरात द्यावी.

९) पूरक उद्योगांसाठी आर्थिक सोय करून कर्मचारी व कामगारांच्या मुलांसाठी आर्थिक सुविधा, शैक्षणिक फी सवलत व पूरक उद्योगांस प्रोत्साहन द्यावे. वनीकरण, वैद्यकीय सेवा, त्रिस्तरीय समिती कायदा, श्रमजिवी कायदा १९६१, माथाडी कायदा १९६९ लागू करावा.

१०) स्त्रियांसाठीचे पूरक उद्योग व सर्व प्रकारचे भत्ते सुरू करावेत.

११) १८% पगार वाढ करून, करार वेतन कायदा लागू करावा.

१२) कामगारांना/कर्मचारी वर्गाला २०% बोनस, हुद्देवारी व वर्गवारी द्यावी. औद्योगिक प्रशिक्षण देऊन समान स्टॅन्डींग कायदा लागू करावा.

१३) अपघातग्रस्त व आपत्तीग्रस्त लोकांना आर्थिक मदत द्यावी. समाज मंदिरे व व्यायामशाळा सुरू करावीत.

### ७.३.३ कारखान्यांतील ऊसतोड व वाहतूक मजुरांसंबंधीच्या शिफारशी

१) ऊस तोडणी मजुरांच्या मूळ गावी त्यांच्या मुलांची वसतिगृहात राहण्याची, शिक्षणाची व जेवणाची सोय व्हावी यासाठी शासनाने व कारखान्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी अनुदान पुरविणे आवश्यक आहे.

२) राज्यातील व जिल्ह्यातील कारखान्यांनी ऊस तोडणीचे दर वाढवून द्यावेत व साखर कारखान्यांनी कार्यक्षेत्रात पाळणाघराची व राहण्याची सोय करावी.

३) कारखाना क्षेत्रात हंगामी मराठी माध्यमाच्या साखरशाळा सुरू कराव्यात व शासनाने अनुदान देऊन त्यांच्या व्यवस्थापनासंबंधी कडक सोय करावी व वरचेवर खात्री करावी.

४) ऊस तोडणी प्रक्रियेत बाल कामगारांची संख्या कमी करण्यासाठी बालमजूर प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.

५) ऊस तोडणी कामास सुरुवात होण्यापूर्वी कामगारांची कारखाना क्षेत्रात नेऊन सोडण्याची व्यवस्था कारखान्यांनी करावी.

६) कारखाना क्षेत्रात ऊस तोड मजुरांचे ५-६ महिने फक्त रोजगार मिळतो. त्यांना वर्षभर काम मिळण्यासाठी कारखान्याने इच्छूक कामगारांना पाझर तलाव, मातीचे बंधारे बांधकाम, नालाबंदी, रस्ते दुरूस्ती अशी वर्षभरासाठी कामे द्यावीत. जेणेकरून १०० ते ४०० कि.मी. वरून ऊस तोडणी कामगार स्थलांतर करत असतात.

७) ऊस तोड मजुरांसाठी डॉ. विखे पाटील ऊस तोड मजुर सुरक्षा विमा योजना लागू करण्यात आली आहे. त्याचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यांवर दंडात्मक कारवाई शासनाने करावी.

८) ऊस तोड मजुरांसाठी इतर राज्यांप्रमाणे स्वस्त दरात रेशन दुकानाची व्यवस्था करावी. अशा पद्धतीचा आदेश शासनाने काढून सक्तीने अंमलबजावणी करावी.

९) ऊस तोड मजुरांना कामगार म्हणून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे ऊस तोड मजुर संघटनांनी त्यासंबंधी योग्य ती दखल घेऊन योजनेचे फायदे घ्यावेत.

१०) वेतन निवाड्यात ठरल्याप्रमाणे राज्यात व जिल्ह्यातील कारखान्यांनी पशुवैद्यकीय दवाखाने सुरू करावे. तसे बंधनकारक आदेश द्यावेत.

११) त्रिस्तरीय समितीचे नियम (कारखान्याचा, शासनाचा व ऊस तोड मजुरांचा १-१ प्रतिनिधी घेऊन) साखरकारखान्यांचे व्यवस्थापन करावे आणि ऊस तोड मजुरांना एक महिन्याचे वेतन बक्षीस म्हणून द्यावे व सर्व साखर कारखान्यांमध्ये एकसारखेपणा असावा.

१२) ऊस तोड मजुरांना मोफत वैद्यकीय सेवा आणि पशुवैद्यकीय दवाखान्यांची सोय मिळावी यासाठी शासनाने व कारखान्यांनी पुढाकार घ्यावा.

१३) साखर कारखाना क्षेत्रात मजुरांसाठी स्वतंत्र सहकारी पतपेढ्या सुरू करून कर्जे मिळावी व हफ्त्याहफ्त्याने कर्जाची परतफेड अथवा वसुली करावी.

१४) शासनाने हमाली–माथाडी कामगार कायदा १९६९ चा परत सुरू करावा. इतर राज्यात हमाली–माथाडी कामगार कायदा १९६९ लागू झालेला आहे. तोच महाराष्ट्र शासनाने लागू करावा.

१५) कारखान्यांनी ऊस तोड मजुरांची थेट भरती व नेमणूक करावी. त्यामुळे मुकादम किंवा ठेकेदारांची संख्या कमी होऊन आर्थिक शोषण कमी होईल व मुकादमांचे कमिशन मजुरांच्या कल्याणकारी योजनांसाठी वापरता येईल.

१६) ऊस तोड मजुरांना दारिद्र्यरेषेखालील कार्डाचे वाटप करावे. त्याचा फायदा मजूर व कारखान्याला मिळावा.

१७) ऊस तोड मजुरांचे व्यसनाचे प्रमाण कमी होण्यासाठी व्यसनमुक्ती व जनजागृतीच्या कार्यक्रमांचे नियोजन कारखान्यांनी करावे.

१८) ऊस तोड मजुरांच्या मुलांसाठी उच्च शिक्षणासाठी शासनाने शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्कामध्ये सवलत द्यावी किंवा सोय करावी.

१९) टायर सेंटर, डोकी सेंटर व बैलगाड्या तसेच टायर पंक्चर व पुरवठा कारखान्यांनी सोय करावी की ज्यामुळे ऊस वाहतूक करणे सोईचे होईल.

२०) कारखान्यांच्या ठिकाणी शेतीविषयक पुस्तक व तंत्रज्ञानाच्या माहितीची पुस्तके ठेवून आधुनिक पुस्तकालय करणे. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांना वैज्ञानिक शेती करता येईल.

## ७.४ गृहितकांची पडताळणी:

अभ्यासासाठी निश्चित केलेल्या गृहितकांच्या पडताळणी संबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ७.१ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ७.१**

**गृहितकांची पडताळणी संबंधी**

| अ. क्र. | गृहितके | पडताळणीचे तक्ता क्रमांक |
|---|---|---|
| १ | सहकारी साखर कारखान्यांमुळे सामाजिक व आर्थिक विकासाला मदत झाली आहे. | तक्ता क्रमांक- ३.१, ३.२, ३.३, ३.४, ३.५, ३.६, ३.८, ३.१०, ४.१, ४.२, ४.३, ४.४, ४.५, ४.६, ४.७, ४.८, ४.९, ४.१०, ४.११, ४.१२, ४.१३ |
| २ | सहकारी साखर कारखान्यांमुळे पुणे जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी, कामगार व ऊसतोड मजूर यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्याच्या राहणीमानात बदल घडून येत आहे. | तक्ता क्रमांक- ४.२, ४.३, ४.४, ४.५, ४.६, ४.७, ४.८, ४.१०, ४.११, ४.१२, ४.१३, ५.१, ५.३, ५.१०, ५.११, ५.१२, ५.२०, ५.२१, ५.२२, ५.२४, ५.२५, ६.४, ६.६, ६.७, ६.८, ६.९, ६.१०, ६.११, ६.१२, ६.१४, ६.१८, ६.१९, ६.२०, ६.२१, ६.२३, ६.२४, ६.२६, ६.२८, ६.३०, ६.३२, ६.३३, ६.३४, ६.३५ अ), ६.३५, ब), ६.३५, क), ७.२ |
| ३ | सहकारी साखर कारखान्यांच्या उप-उत्पादन निर्मितीमुळे कारखान्यांच्या विकासाला चालणा मिळत आहे. | तक्ता क्रमांक- ५.३२, ६.१०, ६.११, ६.१२, ६.१४,, ६.१५, ७.२<br>पान क्रमांक- १३५, १३६, १३७, २५२, २५३, २५४<br>परिशिष्ट- ७ अ), ७ ब), ७ क), ७ ड), ७ इ), ७ फ) |
| ४ | सहकारी साखर कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध प्रकल्प व योजना राबवितात. | तक्ता क्रमांक- ५.२, ५.२४, ५.२७, ५.२९, ५.३०, ६.११, ६.१२, ६.१४, ६.१५, ६.१९, ६.३३, ६.३४, ६.३५ अ), ६.३५, ब), ६.३५, क), ७.२<br>पान क्रमांक - १२९, १६५ ते १९१ |

**वरील तक्ता क्रमांक ७.१ वरून असे निदर्शनास येते की, सदर अभ्यासाची ठरविलेली गृहितके पडताळणीसाठी घेतलेल्या तक्ता क्रमांकातील आकडेवारी व माहिती वरून निश्चित केलेली चारही गृहितके खार ठरत आहेत.**

## ७.५ आर्थिक व सामाजिक परिवर्तणाचे घटक:

पुणे जिल्ह्यात साखर कारखान्यांमुळे घडून आलेल्या आर्थिक व सामाजिक परिवर्तणाच्या अभ्यासलेल्या बाबींची यादी पुढील तक्ता क्रमांक ७.२ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ७.२**

**सामाजिक व आर्थिक परिवर्तणाचे घटक**

| अ. क्र. | सामाजिक घटक | आर्थिक घटक |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक सुविधा (संकुले) | निर्वाह वेतन |
| २ | साखर शाळा | सर्वप्रकारचा वीमा |
| ३ | सामुदायिक  विवाह नियोजन | निवृत्ती वेतन योजना |
| ४ | आधुनिक कृषी अवजारांचे वाटप | किमान वेतन कायदा |
| ५ | व्यायाम शाळा | घरकुल योजना |
| ६ | आरोग्य विषयक | सेवक पतपेढ्या |
| ७ | रेशन दुकान | कर्ज वाटपाची सोय |
| ८ | पशु वैद्यकिय | लाभांश |
| ९ | पाळणाघर | अनामत रक्कमेचे वाटप |
| १० | नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई | कोपीचे साहित्य |
| ११ | समाज भवन बांधणी | जाण्या-येण्याचा खर्च |
| १२ | पिण्याच्या पाण्याची उपलब्धता | टायरगाडी पंक्चरची सुविधा |
| १३ | सुलभ शौचालय | ऊसतोडणीचा दर |
| १४ | वीज जोडणी | आजारपण व बाळंतपणाचा खर्च |
| १५ | रस्ते बांधणी | कामागार निवास भवन |
| १६ | वाचनालये | सभासद कुटुंबाचे उत्पन्न |
| १७ | वसतीगृहे | सभासद कुटुंबाचे खर्च |
| १८ | करमणूक कार्यक्रमांचे आयोजन | सभासद कुटुंबाचे कर्ज |

वरील तक्ता क्रमांक ७.२ वरून असे निदर्शनास येते की, पुणे जिल्ह्यात साखर कारखान्यांमुळे घडून आलेल्या आर्थिक व सामाजिक परिवर्तणाच्या वरिल घटाकंचा अभ्यासकाने सविस्तर अभ्यास केला आहे.

ऊसापासून साखर कारखाने तयार करतांना साखरेमध्ये असलेले संयुक्त घटाकांची माहिती असणे आवश्यक आहे. साखर तीन घटकांनी तयार होते ते पुढील प्रमाणे $C_{12}H_{22}O_{11}$ आहे.